# प्रकरण १

# राग; उत्पत्ती आणि परिभाषा

भारतीय संगीतामध्ये राग संकल्पना अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे. या संकल्पनेमुळेच भारतीय संगीत इतर संगीतापासून वेगळे दिसून येते. रागतत्त्व हा भारतीय संगीताचा प्राण आहे. अभिजात भारतीय संगीताने स्वतःचा एक वेगळा ठसा जनमानसावर उठविला आहे. ॐकारापासून निर्मिती झालेल्या भारतीय संगीताने वेदगायनापासून आजच्या ख्यालगायनापर्यंत अनेक स्थित्यंतरे पाहिली. संगीतातील गीतप्रकारांमध्येही आमूलाग्र बदल झाला. वैदिक काळात केवळ दोन तीन स्वरांच्या आधारावर असलेल्या संगीताला आज रागगायनाद्वारे पूर्णत्त्व प्राप्त झाले आहे.

उत्पत्तीच्या दृष्टीने पाहिले असतां 'राग' या शब्दाचे मूळ आपल्याला संस्कृत भाषेमध्ये सापडते. रञ्ज या धातूपासून राग या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. राग शब्दाचे अनेक अर्थ पुढीलप्रमाणे आहेत.

" वर्ण, रंग, रंजक वस्तु
लाल रंग, लालिमा (अभिज्ञानशाकुंतलम्)
भावना
हर्ष, आनंद
क्रोध, रोष
संगीतातील राग
संगीत माधुर्य (शाकुंतल)
खेद, शोक
लालच, ईर्षा" [१]

अशाप्रकारे राग शब्द अनेक अर्थांनी नाटयशास्त्रात आणि कालिदासाच्या काव्यात वापरला गेला आहे. संगीतात राग हा शब्द

रंजनापासून निर्माण झाला आहे. जो रंजन करतो, तो राग. "रंजयती इति रागः।" अशी त्याची व्याख्या केली जाते. संगीतात रंजन करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत , असे असूनसुध्दा त्यांना राग म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे एखादया रागाद्वारे जरी श्रोत्यांचे मनोरंजन झाले नाही, तरीही त्याला रागच म्हणावे लागेल. एखादया विशिष्ट सांगीतिक तत्त्वालाच राग म्हणतात. म्हणून संगीतात राग हा योगरूढ म्हणजे विशेष अर्थाने वापरण्यात येणारा शब्द आहे.

ऐतिहासिक दृष्टया राग ही संकल्पना मतंग मुनींद्वारा संगीत शास्त्रावरील बृहद्देशी या ग्रंथाच्या निर्मिती काळापासून,इ. स. च्या तिसऱ्या शतकापसून अस्तित्वात आली. त्यापूर्वी भरताच्या नाटयशास्त्रात जातिराग, ग्रामराग असे उल्लेख मिळतात. यांनाच आजच्या रागस्वरूपाचे बीजरूप मानले गेले आहे.

बृहद्देशीमध्ये मतंगाने **कश्यप** द्वारा सांगितलेली राग गीतीची परिभाषा उद्धृत केली आहे. ती पुढीलप्रमाणे –

"चतुर्णामपि वर्णानां योगा रागाः शोभना

स सर्वो दृष्यते येन तेन रागा इति स्मृताः।" [२]

अर्थात, जो स्थायी,आरोही, अवरोही आणि संचारी या चार वर्णांनी शोभित आहे, आणि हे सर्व (वर्ण) जिथे दिसून येते ते राग होय.

याच अर्थाला अनुसरून मतंगानेही **बृहद्देशी** मध्ये राग शब्दाची व्याख्या केली आहे.

"स्वरवर्ण विशेषेण ध्वनिभेदेन वा पुनः

रज्यते येन यः कश्चित् स रागःसंमतः सताम्।।" [३]

त्याचप्रमाणे आधुनिक काळातही राग संकल्पनेला लागू पडणारी राग शब्दाची व्याख्या म्हणजे –

"योऽयं ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूषितः

रञ्जको जनचित्तानां स राग उदाहृतः।।" [४]

म्हणजेच स्वर आणि वर्णाने विभूषित अशी ध्वनीची विशिष्ठ रचना, ज्यामुळे मनाचे रंजन होते त्यास राग असे म्हणतात. रंजन करण्याच्या गुणामुळेच त्यास राग म्हणतात.

रागाच्या परिभाषेचा मूळ अर्थ तोच ठेवून बृहद्देशीनंतरच्या विद्वानांनी थोडयाफार फरकाने रागाची व्याख्या केली.

१) **संगीत रत्नाकर** –

शारंगदेवकृत संगीत रत्नाकर या ग्रंथामध्येही मतंगाने सांगितलेली राग शब्दाची परिभाषा दिलेली आहे .

"चतुर्णामपि वर्णानां यो रागः शोभनो भवेत्
स सर्वो दृष्यते येषु तेन रागा इति स्मृताः।"

२) **संगीत दामोदर** या ग्रंथात

"यैस्तु चेतांसि रज्यन्ते जगत्त्रितय वर्तिनाम्
रागा इति कथ्यन्ते मुनिभिर्भरतादिभिः ।।" [५]

म्हणजेच ज्याद्वारे तीनही लोकांतील प्राण्यांच्या मनाचे (हृदयाचे) रंजन होते, भरत इत्यादी मुनींनी त्यास राग असे म्हटले आहे , अशाप्रकारे रागाची व्याख्या केली आहे.

येथे एक विशेष गोष्ट नमूद कराविशी वाटते की भरताने नाटयशास्त्रात जातिरागांचा उल्लेख केलेला आहे; मात्र राग शब्दाची परिभाषा त्याने नाटयशास्त्रात कुठेही दिलेली नाही. रागाची व्याख्या आपल्याला सर्वप्रथम मतंगमुनींच्या बृहद्देशीतच मिळते.

३) पार्श्वदेव लिखित **संगीत समयसार** या ग्रंथात स्वर आणि वर्णविशेषाने, ज्याद्वारे सज्जनांच्या चित्ताचे रंजन होते, तो राग होय अशी व्याख्या मिळते.

"स्वर वर्ण विशिष्टेन ध्वनिभेदेन वा पुनः
रंज्यते येन सचित्तं स रागः संमतः सताम्।। " [६]

४)ज्या ध्वनीच्या रचनेत विचित्र वर्ण, अलंकार, असून ज्यात ग्रहादी स्वरांचे संदर्भ आहेत, तसेच जो रंजक आहे, तो राग होय असे **महाराणा कुम्भा**चे मत आहे .

प्राचीन ग्रंथकारांबरोबरच अनेक मध्यकालीन ग्रंथकारांनीही राग या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. या सर्व विद्वानांनी "स्वररचनेचा आनंदमय परिणाम" या कल्पनेला अनुसरून या व्याख्या केलेल्या आहेत.

५)**रागविबोध** ग्रंथात पं. सोमनाथांनी

"स्वर, वर्ण भूषितो यो ध्वनिभेदो रंजकः स राग इह।"[७] अशी रागाची व्याख्या दिलेली आहे.

६) **पं.अहोबल** यांनी रंजक स्वरसंदर्भाला राग असे म्हटले आहे.

"रंजकः स्वरसंदर्भो राग इत्यभिधीयते।"[८]

७) **रसकौमुदी** –

श्रीकंठ द्वारा रचित या ग्रंथात रागाची पुढील परिभाषा आढळते:–

"सुरासुराणां नरकिन्नराणां निरंतरं मानसर जनेन
रागो भवेत् पङ्कजकण शब्दतुल्यो व्युत्पत्तीमादायच योगरूढः
रम्यध्वनि विशेषस्तु सर्व वर्ण विराजितः
स रागो गीयते तज्ज्ञैर्जगन्मानस रञ्जकः।" [९]

८) पं. व्यंकटमखी –

"रंजयति मनांसिती रागाः।" [१०]

ज्या स्वरप्रबंधाद्वारे श्रोत्यांच्या मनाचे रंजन होते, तो राग होय.

९) **हिंदुस्थानी राग पध्दती** आणि **लक्ष्यसंगीत** या ग्रंथात पं.भातखंडे यांनी देखील रागाची व्याख्या योऽयं ध्वनिविशेषस्तु अशीच केली आहे.

१०) **मानसोल्लास** या अकराव्या शतकांतील ग्रंथात जाति आणि राग यांचा विकासक्रम स्पष्टपणे नमूद केला आहे.

११) अकराव्या शतकातीलच **'गुरूचरित्र'** या अध्यात्मिक ग्रंथात अनेक रागांचा उल्लेख केलेला आढळतो.गुरूचरित्रातील सहाव्या अध्यायात शंकराला प्रसन्न

करण्यासाठी लंकेश्वर रावणाने विविध रागांचे समयोचित गायन कसे केले याचे वर्णन आहे.

**शनिमहात्म्य** या पोथीतसुध्दा राजा विक्रमादित्याच्या दीपक रागाच्या गायनाचे वर्णन सापडते.

१२) डॉ. अरूणकुमार सेन – "राग सांगितिक समुद्रमंथन का अमृत तत्त्व है, जो निकला, और निकलकर अमर हो गया ।" ११

१३) डॉ प्रेमलता शर्मा यांच्या अनुसार संगीत शास्त्रांत रागाचा दोन अर्थांनी प्रयोग केला गेलेला आहे. सामान्य आणि विशेष. सामान्य अर्थाने राग रंजकतावाचक असून विशेषअर्थाने राग हा स्वरदेह आणि भावदेहाने युक्त नादमय व्यक्तित्त्वाचे द्योतक आहे स्वरदेहाच्या अंतर्गत त्या भरतप्रणित जातिंसंबंधी दहा लक्षणांचा उल्लेख करतात, तर. भावदेहान्तर्गत स्वरलगाव आणि या लक्षणांच्या सुनिर्धारित प्रयोगाच्या प्रक्रियेचा समावेश होतो.

१४) स्वामी विज्ञानानंदांनी मनोवैज्ञानिकता आणि भावपूर्णतेच्या दृष्टिकोनांतून रागाची व्याख्या केली आहे.

"The concept of raga is, therefore, a product of thought or idea of setting of abstract ideal, of tones, transferred in concrete form." १२

१५) फॉक्स स्ट्रॅंग्वेज–

"Raga, an arbitrary series of notes characterized, as far as possible as individuals, by proximity to or remoteness from the note which marks the tessitural (general level of the melody ), by a special order in which they are usually taken , by the frequency or the reverse with which they occur by grace or the absence of it and by relation to a tonic usually reinforced by a drone."१३

१६) एच. अे. पोपले–

" Ragas are different series of notes within the octave, which form the basis of all India melodies and are differentiated from each other by

the prominence of certain fixed notes and by the sequence of particular notes." [१४]

१७)एच. पी. कृष्णराव –

"A Raga is a melodious combination of musical notes which succed one another. Its effect depends upon the nature of the notes combined. It is like a mixture, the quality of which depends upon nature of its ingredients." [१५]

१८) डॉ. एस. के. सक्सेना –

" A Raga appears not a mere grouping of swaras or some selected swaras, but an intimate unity of accents that make for musicalexperience; and it would not be improper if we speak of it as a kind of euphorganism. The best Hindustani Musicians incline to the view that a raga is like a living entity and that it is therefore to be handeled with the care and love which a live organism demands." [१६]

रागाद्वारे निर्माण होणाऱ्या रसाचे कारणही हा स्वरलगावच आहे .परंतु फिलीप्स स्टर्न आदि पाश्च्यात्य संगीतज्ञांनी त्यात भावपक्षाचाही समावेश केला आहे. त्यांच्या– नुसार स्वरलगाव हे एक साधन असून त्याद्वारे निर्माण होणारी भावाभिव्यक्ती हे एक साध्य होय. "It is the deepening of the ideas of mode that which gives not only the modes but also the choice of principal notes, the degrees to be avoided, the difference of the discendig - ascending movements,the prescribed sequences , the movement of this ambient, this coloration, this peculiar psysiognomy, this personality constitutes the Raga." [१७]

२०) 'संगीताचे सौंदर्यशास्त्र' या पुस्तकात डॉ. अशोक रानडे म्हणतात, "भारतीय संगीतातील रागकल्पना ही एक अनन्यसाधारण गोष्ट आहे . वेगवेगळया सांगीतिक प्रकारांना रूप देणाऱ्या प्राथमिक बीजभूत रूपाचेही कार्य राग करीत असतो . सांगीतिक विकासाच्या संदर्भात पाहता, राग ही एक

भरभक्कम, अनेक शक्यतांनी युक्त अशी बहुदिश आणि लवचिक अशी बैठक वा चौकट होय." [१८]

२१) डॉ. रातंजनकर यांच्यानुसार –

" Raga the soul of Indian Music, the one word which expresses all that is worth knowing about our music is the word Raga."

Technically then Raga means a sweet combination of musical tones coming one after another in succession. [१९]

२२) पं. माणिकबुवा ठाकूरदास यांच्या मते, भावांकित स्वररचनेद्वारे ज्या भावस्वभावाचे चित्र निर्माण होते, त्याला राग असे म्हणतात. [२०]

प्राचीन काळीं मतंगाने सांगितलेली योऽयं ध्वनिविशेषस्तु ही रागाची व्याख्या काय किंवा स्वरवर्णाशी संबंधित मतंगानंतरच्या विद्वानांनी सांगितलेल्या व्याख्या काय, या सर्व व्याख्या विचारात घेता एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे आधुनिक काळात स्वरवर्णाने विभूषित अशी ध्वनिची रंजक रचना ही रागाची परिभाषा एवढी सामान्य स्वरूपाची ठरते की आजच्या चित्रपट गीतांच्या चालींचा समावेशही त्यात केला जाऊ शकेल, कारण राग परिभाषेत आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी या गीतांमध्ये आढळतात. त्यामुळे शास्त्रनियमांना समावेशक अशी रागाची व्याख्या आधुनिक काळांत करणे आवश्यक वाटल्याने आधुनिक विचारवंतांनी या संकल्पनेवर सूक्ष्मपणे विचार करून, रागाच्या गुणांची सविस्तर चर्चा केली आहे. प्राचीन संगीततज्ञांनी सांगितलेल्या रागाच्या व्याख्येवर सर्वांगीण विचार करून , त्यावर चिंतन, मनन करून स्वतःच्या प्रतिभेचा वापर करून त्यांनी रागाचा मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही पातळयांवर विचार केला. मूर्त पातळयांवरील रंजकता, ग्रह , अंश, न्यासादी गोष्टींबरोबरच अमूर्त पातळीवरील स्वरलगाव, त्यांच्या विशिष्ठ शैली, त्यातील स्वरसंगती, त्यातील कण आदींद्वारे प्रकट होणारे वैचित्र्यपूर्ण ढंग,कलाकाराच्या व्यक्तिनिष्ठ पध्दतीद्वारे एखादा राग प्रस्तुत करतांना झालेले फरक आदी अनेक गोष्टींचा आवाका पाहतां रागाची परिपूर्ण, सर्वसंमत आणि

संक्षिप्त व्याख्या करणे खरोखरच कठीण आहे. मात्र सर्वच ग्रंथकारांच्या अनुसार रस आणि भाव हा रागाचा आत्मा असून राग हा भारतीय संगीताचा आत्मा आहे यात दुमत नाही.

आधुनिक युगात रागाची व्याख्या करतांना प्राचीन ग्रंथकारांनी सांगितलेल्या रागाच्या व्याख्येबरोबरच वरील सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

वरील सर्व परिभाषांच्या अभ्यासाअंती राग हया संकल्पनेची आधुनिक युगातील परिभाषा पुढीलप्रमाणे करता येईल :–

"स्वरवर्णांनीयुक्त अशा विशिष्ट रंजक स्वरसंगतींचा व्यक्तिनिष्ठ पध्दतीने स्वर, लय, आणि बंदिशींच्या माध्यमांतून, शास्त्रनियमांच्या आधारे केलेला आविष्कार म्हणजे राग होय."

भरतकालीन जातिगायनात बीजरूपात असलेल्या रागस्वरूपाचा आज संपूर्णपणे विकसित वृक्ष झालेला आहे. संपूर्ण भारतीय संगीताचा राग हा आत्मा समजल्या जातो. रागाचे हे परिपूर्ण रूप प्राप्त होण्याआधी जातिगायनापासून त्यात कोणकोणती स्थित्यंतरे झाली, याचा अभ्यास करणे विषयाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

---------